॥ खंड १० ॥
॥ अर्ज भाग ०१ ॥
॥ अरज नं. ०४ ॥
॥ मुळावरची अरज ॥

॥ कृष्ण राया धराव छाया ॥

॥ कृष्ण राया, धराव छाया । बाळा च्या वर । भक्तां च्या वर ।
देहे तारून उभे राहीले । पुर्ण अवतार ॥ घृ ॥०१॥
किंवा :- बहुत यवग देहे तारा । या भुम्मेवर ॥ घृ ॥
॥ नित्य सुमरना, तुही प्रार्थना । चित्त/मन लावुन करतो
कर मजवर, दया । तुमच्या, सुमरणी राहो ॥
॥ करतो विनंती, उभे श्रीपती । धर मजवर छाया ।
सदा विनवितो, मुखीं उभा । राहयं राम राया ॥
॥ विठ्ठल दयाळा, माझा संभाळ । आहे तुम्हा हाती ।
धरले तुमचे, पाय । नाही, सोडत जगजेठी ॥
॥ रूपी सावळा, अंगी कळा । हा भारी आहे ।
धनी/धन्य कारागीर, याहीची माव । कोणा ना कळे ॥
॥ अंगी कार, भक्तीला आधार । श्री, कृष्णाचा आहयं ।
हाच करन, प्रतिपाळ । सा-या, जगाला साहयं ॥०६॥

॥ तुमचा धावा, करतो देवा । आपल्या अंतरी ।
कर मजवर, दया । माझं, संकट निर्वाळी ॥
॥ तुम्ही तारलं, कृपा केली । माझे जग जीवना ।
चत्रभुज-रूक्मिणा, तुम्ही व्हा । माझे मन मोहना ॥
॥ उभे/तुम्ही श्रीहरी, मजला तारी । तु बम्ह चारी ।
निशंःकलंकी, अवतार ज्योत । ओळखा हो भारी/न्यारी ॥
॥ आकाशमात, अवधुत हंकार । सावंग्याशी आला, साहयाशी आला ।
तुमचे नाम, सुमरन करता । शिणभाग हर्ला ॥
॥ अनंत माव, तुमची कळेना । बम्हादिकाला हो, इंद्रदिकाला ।
कळ सुत्रावर, कळा धरूनदेव/धनीदेव । तारण अनेकाला/अवघ्याला..
भजने :- ।। हरी हरी बाबा, कृष्ण भजले । निर्गुण, नामी तरले ।
तु तार बा आम्हाले ।।
।। निर्गुण अवतार बहुता गुण । भक्तीचं वाढंवलं निशाण ।
शकुनी कळतीनं लक्षणं ।।
।। हरीहरी कृष्णा ! तु जगाच्या जीवना । तु जगाच्या जिवना
भक्तीला लावले त्वां बा अवघे जना ।।
।। हरीहरी कृष्णा ! तु जगाचं जीवन । तु जगाचं जिवन
ही पाण्याची नर देही । तार येवुन ।।
।। हरीहरी कृष्णा ! तुला बहु यवग विनवी । तुला बहुयवग विनवी
हा देहे-जीव नांदव एका ठायी ।।
।। हरीहरी कृष्णा ! तुझी संगत घडली बरी । तुही संगत घडली बरी
या कलयवगामध्ये भक्त । तारा श्रीहरी ।
माझा हो माथा तुमच्या चरणा वरी ।।

-: चरणांचा क्रम लक्षात ठेवण्यासाठी टिप :-
हे [1]कृष्ण राया । तुमच्या [2]नित्य सुमरना राहुन [3]करतो विनंती, [4]विठ्ठला दयाळा [5]रूप सावळ्या की : तुम्ही आता [6]अंगी कार करून या जगास साहय करत राहा.
[7]तुमचा धावा करतो कारण की : प्रथम [8]तुम्हीच तारले, [9]श्रीहरी । तुम्हीच [10]अकाशमात मध्ये उभा राहुन [11]अनंत माव करून आम्हास साहय करत आहेस.

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥